## अंतीम हुकूमनामा अर्ज नं. २/२०२०
## निशाणी १७ वर आदेश
## (कै.चिमासो जगदाळे तर्फे मयत वारस श्री.धनाजीराव जगदाळे वगैरे वि. चेअरमन, श्री.दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., दत्तनगर )

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये नियोजीत वि.प.क्र.२ ते १० यांना अर्जाच्या कामी सहभागी करुन घेणेकरिता दाखल केला आहे.

०२. अर्जदारांचे कथन असे की, प्रस्तुत अंतिम हुकूमनामा अर्ज हा प्राथमिक हुकूमनामा नियमीत दिवाणी दावा क्र.१०/१९७२ चे हुकूमनाम्यावर दाखल केलेला आहे. प्रस्तुत कामी मूळ हुकूमनाम्यातील सर्व पक्षकारांना सामील केलेले नाही, असा कार्यालयीन आक्षेप नोंदवला होता, तेंव्हा प्रस्तुत कामाच्या चौकशी वेळी मूळ दाव्यातील पक्षकारांना सामील करत असलेबाबत अंडरटेकींग दिले होते. त्यानुसार प्रस्तुतचा अर्ज मूळ कामातील पक्षकारांना सामील करुन घेण्यासाठी दाखल केला आहे. जे मूळ पक्षकार मयत आहेत. त्याठिकाणी त्यांच्या वारसांना याकामी सामील केले आहे. सबब, अर्जात नमूद केल्याप्रमाणे वि.प.क्र.२ ते १० असे पक्षकार अर्जात व निशाणी ५चे अर्जात सामील करुन घेण्याबाबत विनंती केली आहे.

०३. वि.प. यांनी निशाणी १९ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व लबाडीचा आहे. अर्जदार यांनी अर्ज दाखल करण्यापूर्वीच मूळ कामातील सर्व प्रतिवादींना याकामी सामील करुन घेणे गरजेचे होते. परंतू, तसे न करता यातील अर्जदार यांनी सदरचा खोटया व लबाडीच्या मजकुराचा अर्ज दाखल करुन न्यायालयाचा वेळ वाया घालवत आहेत. अर्जदार यांनी ज्यांना पक्षकार करावयाचे आहेत ते सदर कामी कशासाठी जरुरीचे पक्षकार आहेत, याबाबत अर्जामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सदरचा अर्ज अर्जदाराने मालाफाईड उद्देशाने दाखल केलेला असल्याने न्यायालयीन खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलाकन केले. प्रस्तुत अंतीम हुकूमनाम्याचा अर्ज हा प्राथमिक हुकूमनामा नियमीत दिवाणी दावा क्र. १०/१९७२ चे प्राथमिक हुकूमनाम्यावर दाखल केला असल्याचे दिसून येते. अभिलेखावर दाखल नियमीत दिवाणी दावा क्र. १०/१९७२ मधील निशाणी १ च्या प्रतीचे अवलोकन केले असता अर्जदाराने ज्या नियोजीत पक्षकारांना वि.प. म्हणून सामील करण्याची परवानगी मागितलेली आहे ते सर्व नियोजीत पक्षकार हे सदर दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी म्हणून पक्षकार असल्याचे दिसून येते. त्या दाव्यामधील काही पक्षकार हे मयत झालेले असल्याने प्रस्तुतच्या हुकूमनाम्याच्या अर्जामध्ये मयताचे वारसदेखील पटलावर येणे गरजेचे आहे. वि.प. यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये नियोजीत पक्षकार हे आवश्यक व जरुरीचे पक्षकार नसल्याबाबत काही कथन केले नाही. परंतू त्यांनी प्रस्तुत हुकूमनामा दाखल करण्यापूर्वीच मूळ कामातील सर्व पक्षकारांना सामील करुन घेणे गरजेचे असल्याचे कथन केले आहे. तरी सदर मुद्दयांवर अर्ज नामंजूर करता येणार नाही. प्रस्तुतचा हुकूमनामा हा वाटपाकरिताच्या दाव्याबाबतचा असल्याने सर्व सहहिस्सेदारांना प्रस्तुत हुकूमनाम्याच्या कामी सामील करणे आवश्यक आहे, असे असताना अर्जदाराने नियोजीत वि.प.क्र.२ ते १० यांना पक्षकार केलेले नाही. नियोजीत पक्षकार हे प्रस्तुत कामी आवश्यक पक्षकार आहेत कारण त्यांच्याशिवाय प्रस्तुत कामातील प्रश्नांची सोडवणूक होणार नाही. करिता त्यांना सदर कामात वि.प.क्र.२ ते १० म्हणून सामील करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, या अर्जाच्या निर्णयास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:–

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज (निशाणी १७) मंजूर करणेत येत आहे.

२. प्रस्तुत कामी नियोजीत पक्षकार यांना वि.प.क्र.२ ते १० म्हणून सामील करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने अर्जदाराने निशाणी १ व ५ मध्ये पुढील तारखेपर्यंत पक्षकार सामील करुन तशी दुरुस्ती करावी व त्यानंतर वि.प.क्र.२ ते १० यांना नोटीस काढण्यात यावी.

Digitally signed by ROHINI A JADHAV
Date: 2021.02.03 16:57:19 +0530

दिनांकः– ०३.०२.२०२१. **(रोहिनी अ. जाधव)**
जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश क–स्तर,
जयसिंगपूर.